# एकोणतीस वर्षातही अतिशय जोमाने वाटचाल चालू आहे...

इच्छाशक्ती, जिद्द आणि प्रामाणिकपणा असेल तर कोणत्याही क्षेत्रात प्रगती करता येते व त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे " मानवतावादी समाज सेवा संघटना". निराधार, वयोवृद्ध मंडळीही समाजाचा अविभाज्य घटक आहेत. 'भारत माझा देश आहे , सारे भारतीय माझे बांधव आहेत, ही प्रतिज्ञा फक्त पुस्तकात असुन चालणार नाही तर ती दैनंदिन आचरणात आणून त्याप्रमाणे कृती करणे गरजेचे आहे याच उदात्त भावनेने प्रेरित होऊन सामाजिक जबाबदारीची जाणीव असणा-या शिक्षण खात्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन दिनांक १४ आक्टोबर १९९४ रोजी " मानवतावादी समाज सेवा संघटनेची " स्थापना केली. त्यानंतर संघटनेचे काम पाहून शासनाच्या विविध खात्यात काम करणारे अधिकारी, कर्मचारी, यांच्या बरोबरच लेखपाल, व्यापारी, वकील, कलाकार, इंजिनिअर, संस्थाचालक, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक इत्यादिंनी या संघटनेचे आजीव सदस्यत्व स्विकारलेले आहे . सर्वात महत्वाची नमुद करण्यासारखी बाब म्हणजे ही संघटना धर्मकारण, राजकारण यांच्यापासून पुर्णपणेअलिप्त आहे. मानवतावादी समाज सेवा संघटनेची महाराष्ट्र शासनाकडे रितसर नोंदणी झालेली आहे.

आज जरी मानवतावादी समाज सेवा संघटनेने भरीव यश मिळवून आपला विस्तार केलेला दिसत असला तरी त्यामागे सर्व पदाधिकाऱ्यांचे अपार कष्ट आहेत ही बाब दुर्लक्षिता येणार नाही.

मागे वळून पाहताना संघटनेच्या गेल्या २८ वर्षातील कामगिरीचे सिंहावलोकन करावयाचे झाल्यास असे निश्चितपणे सांगता येईल कीं,

" इवलेसे रोप लावियले द्वारी तयाचा वेलू गेला गगनावरी मोगरा फुलला, मोगरा फुलला फुले वेचिता बहरु कळियांशी आला "

२८ वर्षा पूर्वी लावलेल्या मानवतावादी समाज सेवा संघटना रुपी छोट्या रोपट्याचे आज एका मोठ्या वटवृक्षात रूपांतर झालेले आहे व त्यांनी या कालावधीत हाती घेतलेल्या विविध समाजोपयोगी कामांचा महिमा सर्वत्र निनादत आहे.

जगात उपाशी लोक सर्वत्र आहेत. पण गरीबी म्हणजे फक्त उपाशी असणे नव्हे. प्रेमाचा अभाव ही एक प्रकारची गरीबीच आहे. जगात असे अनेक लोक आहेत ज्यांना कुणाचाच आधार नाही. शरीराने दुर्बल झालेल्या लोकांपेक्षा मनाने खचलेल्या लोकांचे मनोधैर्य वाढवून विविध कार्यक्रमाद्वारे त्यांच्यात उत्साह व उभारी निर्माण करून त्यांचे जीवन आनंदमय व सुखी करण्याचे ध्येय हेच एकमेव लक्ष्य ठरवून त्या दिशेने मानवतावादी समाज सेवा संघटनेची वाटचाल सुरू आहे.

मानवतावादी समाज सेवा संघटनेने शैक्षणिक वर्ष 2023-2024 पासून अनाथ/निराधार/गरीब मुलींच्या 12वी पर्यंतच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी पहिल्या टप्प्यात उचलण्याचा नवीन उपक्रम हाती घेण्याचे ठरविले आहे." मुलगी शिकली प्रगती झाली" असे नेहमी म्हटले जाते. मात्र आज अशा अनेक मुली आहेत की ज्यांना आर्थिक

परिस्थिती मुळे शिक्षण घेणे शक्य होत नाही.अशा मुलींना संघटनेमार्फत दत्तक घेऊन त्यांच्या संपूर्ण शिक्षणाचा खर्च संघटना उचलणार आहे. दत्तक घेणा-या मुलींची संख्या प्रत्येक वर्षी टप्याटप्याने वाढविण्यात येईल.

थंडीच्या दिवसात फुटपाथ व झोपडपट्टी क्षेत्रातील गोरगरीब, अनाथ यांना चादरी ब्लेंकेट, कपडे व भोजन वाटप करणे. वृद्धाश्रम, अनाथाश्रमे , महिलाश्रम, मुकबधीर शाळा, अंधशाळा, अपंग व मतिमंद विद्यार्थ्यांच्या शाळांना भेटी देऊन त्यांना मिठाई, फळे, औषधे वाटप करणे, मागास भागातील शाळांमधील विद्यार्थ्यांना कपडे वाटप, तसेच विविध आश्रमात जाऊन तेथील आश्रितांना आर्थिक, बौध्दिक तथा मानसिक आधार देण्याचे काम मागिल 28 वर्षांपासून सातत्याने सुरू आहे.

---

## MOVING IN ITS TWENTY-NINTH YEAR WITH GREAT VIGOUR…

If there is willpower, perseverance and honesty, progress can be made in any field and the best example of this is the " Manavtawadi Samaj Sewa Sanghatna (Humanitarian Social Service Organization)". The destitute, the elderly, are also an integral part of society.

'India is my country, all Indians are my brothers and sisters,' this pledge should not be limited to books alone but must be brought into daily practice and our behaviour should appropriate it --- was the noble sentiment that inspired the officers and staff of the Education Department, who were aware about their responsibility towards the society, to come together and establish the Manavtawadi Samaj Sewa Sanghatna, Pune, (Humanitarian Social Service Organization, Pune) on October 14, 1994.

After witnessing the work of the Organization, officers, employees working in various departments of the government, as well as lekhpals, traders, lawyers, artists, engineers, institutionalists, eminent citizens from different fields, etc. have accepted the life membership of this Organization.

The most important thing to note is that this Organization is completely detached from religion and politics. Manavtawadi Samaj Sewa Sanghatna, Pune, has been registered with the Government of Maharashtra as per protocols.

Today, even though the Organization seems to have expanded with great success, the fact cannot be overlooked that there is tremendous hard work of all the office bearers that goes behind it.

Looking back, if you want to take an overview of the performance of the Organization in the last 28 years, it can be said with certainty—

“The small sapling that I had planted at doorstep has reached the skies in due course of time. The jasmine has blossomed, jasmine has blossomed. While collecting the flowers remaining buds have fully bloomed.”

The small sapling of a Manavtawadi Samaj Sewa Sanghatna planted 28 years ago has turned into a big banyan tree today and the glory of the various social works undertaken by it during this period is being proclaimed everywhere.

There are hungry people everywhere in the world. But poverty is not just about being hungry. Lack of love is a form of poverty. There are many people in the world who have no support. With a single motive of providing courage and enthusiasm to those tired in the minds more than being exhausted in the body, Manavtawadi Samaj Sewa Sanghatna is moving forward to make their lives happier and contented through its various undertakings.

Manavtawadi Samaj Sewa Sanghatna has decided to take up a new initiative from the academic year 2023-2024. In the first phase, it will shoulder the educational expenses of orphan/destitute/poor girls up to 12th std.

It’s always said that if a girl learns, we progress. today there are many girls who are not able to get education due to financial constraints. By adopting such girls through our Organization, we will bear the entire cost of their education. The number of girls to be adopted will be gradually increased every year and in the subsequent phases.

Manavtawadi Samaj Sewa Sanghatna has decided to take up a new initiative from the academic year 2023-2024. In the first phase, it will shoulder the educational expenses of orphan/destitute/poor girls up to 12th std. It’s always said that if a girl learns, we progress. today there are many girls who are not able to get education due to financial constraints. By adopting such girls through our Organization, we will bear the entire cost of their education. The number of girls to be adopted will be gradually increased every year and in the subsequent phases.

Distributing blankets, clothes and food to the poor, orphans, slum and footpath dwellers during winter. Visiting old-age homes, orphanages, women's homes, schools for the deaf and dumb, blind schools, schools for the physically challenged and mentally retarded students and thereby, distributing sweets, fruits, medicines to them. Similarly, distribution of clothes to the students attending schools in the backward areas, also visiting various ashrams and providing financial, intellectual and psychological support to the dependents has been undertaken for the last 28 years.